महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २० जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### अपक्षांची 'शक्ती' अधोरेखित !

ठाणे महानगरपालिका निवडणुकीत यंदा एक महत्त्वाचा आणि दुर्लक्षित करता न येणारा संदेश मतदारांनी दिला आहे. तो म्हणजे लोकशाही केवळ पक्षांच्या चौकटीत अडकलेली नाही. मोठे पक्ष, भक्कम यंत्रणा आणि प्रचाराची ताकद असतानाही अपक्ष उमेदवारांनी मिळवलेली सव्वा लाखांहून अधिक मते ही केवळ आकडेमोड नसून, प्रस्थापित राजकारणाला दिलेला थेट इशाराच आहे. २७ अपक्ष उमेदवारांना १,४२,०५३ मते मिळणे आणि उर्वरित अपक्षांनाही मोठ्या प्रमाणावर मतदारांचा पाठिंबा मिळणे, याचा अर्थ मतदार आता नाव, चिन्ह किंवा पक्ष पाहून नव्हे, तर व्यक्ती आणि मुद्दे पाहून मतदान करू लागला आहे. अनेक प्रभागांमध्ये अपक्षांनी घेतलेली मते निर्णायक ठरली आणि त्यामुळे मोठ्या पक्षांची विजयाची गणिते कोलमडली. हे चित्र प्रस्थापित राजकीय पक्षांसाठी आत्मपरीक्षणाची वेळ आणणारे आहे. या निवडणुकीत काही अपक्ष उमेदवार अवघ्या काही मतांनी पराभूत झाले, तर काहींनी थेट मोठ्या पक्षांच्या उमेदवारांना जबरदस्त टक्कर दिली. हे दर्शवते की, स्थानिक प्रश्न, परिसरातील कामगिरी आणि थेट संपर्क याला मतदार अजूनही मोठे महत्त्व देतो. पक्षाची छत्रछाया नसली तरी जनतेशी नाळ जोडलेली असेल, तर अपक्षही प्रभावी ठरू शकतो, हे या निकालाने सिद्ध केले आहे. यातून आणखी एक वास्तव समोर येते. जेव्हा पक्षीय राजकारण सत्तासंघर्ष, आरोप-प्रत्यारोप आणि गटबाजीपुरते मर्यादित राहते, तेव्हा मतदार पर्याय शोधतो. अपक्षांना मिळालेला पाठिंबा हा त्या असंतोषाचा आवाज आहे. हा आवाज दुर्लक्षित केला, तर भविष्यात हा प्रवाह अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या निकालातून पक्षांनी शिकण्यासारखे खूप आहे. अपक्षांची 'शक्ती' ही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून, ती लोकशाहीतील सजगतेची खूण आहे. मतदार आता गृहीत धरता येत नाही, आणि हेच या निवडणुकीचे सर्वात मोठे संपादकीय सत्य आहे!

# महापौर आरक्षण सोडतीचा मुहूर्त ठरला !

## ओबीसी, महिला, की ओपन... मंत्रालयातील चिठ्ठी ठरवणार २९ शहरांचा महापौर !




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

मुंबई : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता राजकीय वर्तुळात महापौर कोण? याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. यामुळे राजकीय वातावरण तापले असून, या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या महापौरपदाच्या आरक्षणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. येत्या गुरुवारी, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी मुंबईतील मंत्रालयात महापौरपदाच्या आरक्षणाची अधिकृत सोडत काढण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक राजकीय दिग्गजांचे भवितव्य एका चिठ्ठीवर अवलंबून राहणार आहे.

### ■ या प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित होणार

- अनुसूचित जाती (एससी)
- अनुसूचित जाती महिला
- अनुसूचित जमाती (एसटी)
- अनुसूचित जमाती महिला
- इतर मागास प्रवर्ग
- ओबीसी महिला
- सर्वसाधारण महिला
- खुला प्रवर्ग

### ■ मोठ्या शहरांत धाकधूक, दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

**मुंबई, पुणे, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि नागपूर यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये सत्तास्थापनेसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. मात्र, महापौरपदाचे आरक्षण मनासारखे सुटले तरच अनेक इच्छुकांचा मार्ग मोकळा होणार आहे. विशेषतः मोठी मोर्चेबांधणी करणाऱ्यांसाठी हा दिवस निवडणूक निकालापेक्षाही अधिक महत्त्वाचा मानला जात आहे. एखादी जागा खुल्या प्रवर्गात गेल्यास चुरस टोकाला जाण्याची शक्यता आहे; तर महिला प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित झाल्यास अनेक दिग्गज पुरुष नेत्यांना माघार घ्यावी लागू शकते.**

नुकतेच नगर विकास विभागाने यासंदर्भातील अधिकृत पत्रक प्रसिद्ध केले आहे. या पत्रकात महापौरपदाच्या आरक्षण प्रक्रियेची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. ही सोडत मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात सकाळी ११ वाजता, राज्याच्या नगर विकास राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. पारदर्शकतेसाठी चिठ्ठ्या टाकून आरक्षण निश्चित केले जाणार असून, संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही केले जाण्याची शक्यता आहे. या वेळी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव तसेच इतर वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

■■■■

**■ राजकीय गणिते बदलणार?**

निवडणुकीत बहुमत मिळाल्यानंतरही महापौरपदाचे आरक्षण प्रतिकूल ठरल्यास अनेकदा राजकीय समीकरणे बदलतात. अशा वेळी अपक्ष किंवा मित्रपक्षांच्या पाठिंब्यावर सत्तास्थापनेची गणिते मांडावी लागतात. प्रशासकीय पातळीवर सोडतीची सर्व तयारी पूर्ण झाली असून, २९ महापालिकांच्या आयुक्तांना या सोडतीचा अहवाल तातडीने कळवण्यात येणार आहे. दि. २२ जानेवारीच्या दुपारपर्यंत महाराष्ट्रातील प्रमुख शहरांचा प्रथम नागरिक कोणत्या प्रवर्गातील असेल, हे स्पष्ट होणार आहे

# कुपोषण मृत्यू रोखण्यात अपयश

## उच्च न्यायालयाचे राज्य सरकारवर ताशेरे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

**मुंबई :** महाराष्ट्रातील आदिवासी पट्ट्यातील कुपोषणामुळे अर्भक आणि गर्भवती महिलांचे मृत्यू रोखण्यात अपयश आल्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने आज राज्य सरकारला फटकारलं. मेळघाट परिसरातील गर्भवती, स्तनदा माता आणि बालकांच्या मृत्यू प्रकरणी दाखल याचिकांवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली.

खंडपीठाने सरकारला ही समस्या गंभीर असून त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे स्पष्ट सांगितले. न्यायालयाने म्हटले की, या भागात कुपोषणामुळे ११५ अर्भक, गरोदर आणि स्तनदा मातांचे मृत्यू होणे अत्यंत धक्कादायक आहे. तथापि, सरकारने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, सर्व मृत्यू केवळ कुपोषणामुळे घडलेले नाहीत; यामागे इतरही कारणे आहेत.

न्यायालयाने यावेळी राज्य सरकारकडे स्पष्ट अपेक्षा व्यक्त केल्या की, लोकांच्या जीविताचा प्रश्न गंभीर असून यावर दखल घेणे आवश्यक आहे. खंडपीठाने सांगितले की, कुपोषण व आरोग्य सुविधांचा त्वरित अहवाल सादर करून यावर लक्ष द्यावे, अन्यथा प्रशासनिक जबाबदारी विचारात घेण्यात येईल.

**खंडपीठाचा आदेश**

- **मृत्यूची खरी कारणे शोधून त्यावर त्वरित उपाययोजना करणे.**
- **कुपोषण रोखण्यासाठी सरकारचे प्रयत्न अपुरे असल्याचे निदर्शनास आणून देणे.**
- **या भागात किमान आरोग्य सुविधा तत्काळ उपलब्ध करून देणे.**
- **गर्भवती आणि स्तनदा मातांसाठी योग्य चिकित्सक, औषधं व आहार सुविधा सुनिश्चित करणे.**

या सुनावणीनंतर सरकारी अधिकारी आणि संबंधित विभागांमध्ये त्वरित उपाययोजना सुरू होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे आदिवासी भागातील गर्भवती, स्तनदा माता आणि अर्भकांच्या मृत्यूचा धोका कमी करण्यासाठी प्रयत्न वेगाने सुरू होऊ शकतात.

# शिवसेना पक्ष व 'धनुष्यबाण' चिन्हावर उद्यापासून अंतिम सुनावणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

**मुंबई : शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्ह बाबत सर्वोच्च न्यायालयात येत्या बुधवारपासून अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ सलग दोन दिवस अंतिम युक्तिवाद ऐकणार आहे. न्यायालयाने नोव्हेंबरच्या सुनावणीवेळी याबाबत स्पष्ट केले होते. शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्ह कोणत्या गटाला मिळणार, याचा निकाल न्यायालय लवकरच जाहीर करण्याची शक्यता आहे.**

शिंदे गटाने शिवसेना पक्षाशी असलेला संबंध बदलल्याप्रकरणी, पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' चिन्ह केंद्रीय निवडणूक आयोगाच्या २०२२ च्या निर्णयाला ठाकरेंनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी यासंदर्भात याचिका दाखल केली आहे. याशिवाय, शिंदे गटाच्या आमदारांना अपात्र ठरवण्याऐवजी पात्र ठरवणाऱ्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयालाही शिवसेनेचे आमदार सुनील प्रभू यांनी आव्हान दिले आहे. दोन्ही याचिकांवर एकाचवेळी सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालय तयार झाले आहे. सुनावणी २१ जानेवारी रोजी निश्चित करण्यात आली आहे. न्यायालयाने नोव्हेंबरमध्ये सांगितले होते की, २१ व २२ जानेवारी रोजी सलग दोन दिवस अंतिम युक्तिवाद ऐकले जातील आणि त्या दिवशी इतर प्रकरणे सूचिबद्ध केली जाणार नाहीत. कोर्ट मास्टरला या दोन दिवसांत अन्य प्रकरण कार्यतालिकेत न ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील महापालिका, नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून, आता जिल्हा परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. याचदरम्यान शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्हाच्या अंतिम सुनावणीला वेग मिळणार आहे. त्यामुळे या सुनावणीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# सहा नवनिर्वाचित नगरसेवकांविरोधात हायकोर्टात याचिका?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

**डोंबिवली :** गेल्या २५ वर्षांत मोकळ्या जागा, पालिकेचे आरक्षित भूखंड आणि खाडी किनाऱ्यावरील कांदळवन नष्ट करून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत चाळी व इमारती उभारण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ही बेकायदा बांधकामे करणारेच काही जण सध्याच्या निवडणुकीत नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. या प्रकरणात एकूण सहा नगरसेवकांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. स्थानिक नगरसेवकांच्या राजकीय पाठबळावर नियम डावलून बांधकामे झाल्याचा आरोप या याचिकांमध्ये करण्यात येणार आहे.

# नितीन नोवीन भाजपाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाच्या (भाजपा) राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नोवीन यांची निवड निश्चित झाली आहे. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीची प्रक्रिया आज नवी दिल्ली येथे सुरू झाली. नितीन नोवीन यांच्या नावावर ३७ नामांकन अर्ज प्राप्त झाले, तर इतर कोणत्याही उमेदवाराचा अर्ज आलेला नाही, असे निवडणूक निर्णय अधिकारी के. लक्ष्मण यांनी जाहीर केले. नामांकन अर्ज भरण्याची वेळ दुपारी दोन ते संध्याकाळी चार पर्यंत होती, तर माघारीची अंतिम मुदत संध्याकाळी सहा वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली होती. नोवीन यांचा एकट्याचा अर्ज आल्यामुळे पक्षाध्यक्षपदी त्यांची बिनविरोध निवडणूक होणार आहे. सध्या नितीन नोवीन हे कार्यकारी अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

# "भिवंडीत माजी महापौरांच्या घरावर हल्ला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ■ प्रतिनिधी ● दि. १९

भिवंडी : भिवंडी शहरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रभाग क्रमांक १ मधील निकालानंतर आज रात्री उशिरा कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास पाटील यांच्या निवासस्थानी हल्ल्याची घटना घडली. या वेळी अज्ञात जमावाकडून दगडफेक करण्यात आली असून एका वाहनाच्या काचा फोडण्यात आल्या.या घटनेत माजी महापौर प्रतिभा पाटील यांच्यासह दोघेजण जखमी झाल्याची माहिती आहे. घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला असून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. भिवंडीतील प्रतिष्ठेच्या प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीचे मयुरेश पाटील यांनी प्रतिस्पर्धी उमेदवाराचा पराभव केल्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून परिसरात तणावाचे वातावरण होते. आज थेट माजी महापौरांच्या घरावर हल्ला झाल्याने परिस्थिती अधिक चिघळली. यानंतर विलास पाटील यांच्या समर्थकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन केले, तर त्याच वेळी समोर असलेल्या स्थानिक आमदारांच्या कार्यालयाजवळ मोठा जमाव जमा झाला. पोलिसांनी दोन्ही ठिकाणी बंदोबस्त वाढवून परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. पुढील तपास सुरु असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## महत्वाचे

# मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणालीची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणालीची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते वामन खाकर यांनी मुरबाड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी डॉ. लता गायकवाड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामविकास अधिकारी व कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर माहिती फलक, कार्यालयीन वेळा आणि उपस्थितीचा तपशील दर्शवणे देखील अनिवार्य आहे. तरीही, प्रत्यक्ष पाहणी व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींवरून तालुक्यातील बहुसंख्य ग्रामपंचायतींमध्ये अद्याप बायोमेट्रिक मशीन नाहीत, असे खाकर यांनी नमूद केले. दोन वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही याची अंमलबजावणी न होणे गंभीर बाब असल्याचे त्यांनी म्हटले. खाकर यांनी सांगितले की, ग्रामसेवकांची वेळेवर उपस्थिती न होणे, विकास निधीचा विलंब आणि विविध ग्रामविकास कामांमध्ये होणारा अडथळा ग्रामीण विकासाला मोठा ठरतो. यामुळे मुरबाड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली तातडीने कार्यान्वित करावी, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# भिवंडीतील आश्रमशाळेत संक्रांतीचा पतंगोत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

**वज्रेश्वरी :** भिवंडी तालुक्यातील चिंबीपाडा येथील आदिवासी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत मकर संक्रांतीनिमित्त शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या वेळी आयोजित पतंगोत्सव विद्यार्थ्यांसाठी मुख्य आकर्षण ठरला. उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी रंगीबेरंगी पतंग तयार करून त्यावर शिक्षण, जीवनमूल्ये आणि सकारात्मक विचारांवरील सुविचार लिहिले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, नैतिक मूल्ये आणि हस्तकलेची आवड निर्माण करणे हा होता. विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतल्याने शाळेच्या परिसरात संक्रांतीचा आनंदोत्सव संपन्न झाला.

# ठाकरे गटाच्या विजयामागे भाजपाचा हात ?

## मोहने परिसरातील बॅनरने राजकीय चर्चांना उधाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार/दि.19

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीचा निकाल नुकताच लागला असून यामध्ये शिवसेनेचे 53, भाजपा 50, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे 11, मनसेचे 5, काँग्रेसचे 2 तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे 1 नगरसेवक निवडून आले आहेत. यात प्रभाग क्र. 4 मध्ये शिवसेनेच्या दोन उमेदवारांचा पराभव करत शिवसेना ठाकरे गटाचे दोन नगरसेवक निवडून आले असून या विजयामागे भाजपाचा हात असल्याची चर्चा




आता रंगू लागली आहे. त्याला कारण हि तसे असून ठाकरे गटातून निवडून आलेल्या नगरसेविका तेजश्री गायकवाड यांनी निवडून येताच भाजपाचे माजी आमदार नरेंद्र पवार यांची भेट घेतली.

तसेच मोहने परिसरात तेजश्री गायकवाड यांच्या अभिनंदनाचे बॅनर लावले असून या बॅनरवर माजी आमदार नरेंद्र पवार आणि भाजपा पदाधिकारी संतोष शिंगोळे यांचा फोटो असल्याने तर्क वितर्क लावले जात आहेत.

केडीएमसीच्या प्रभाग क्र. 4 मध्ये लागलेल्या निकालाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या प्रभागात शिवसेनेचे दिग्गज मानले जाणारे माजी नगरसेवक मयूर पाटील त्यांच्या पत्नी नमिता पाटील, शिवसेनेचे शाखा प्रमुख रोहन कोट आणि शिवसेना विभाग प्रमुख अंकुश जोगदंड यांच्या पत्नी पूजा जोगदंड यांना उमेदवारी देण्यात आली होती.

यापैकी नमिता पाटील या अवघ्या 8 मतांनी तर रोहन कोट हे 1703 मतांनी निवडून आले. मात्र शिवसेनेच्या मयूर पाटील आणि पूजा जोगदंड यांचा ठाकरे गटाच्या राहुल कोट आणि तेजश्री गायकवाड यांनी पराभव केला आहे.

हा पराभव शिवसेनेच्या चांगलाच जिव्हारी लागला असतानाच, मोहने परिसरात लावलेल्या तेजश्री गायकवाड यांच्या अभिनंदनाच्या बॅनरवर भाजपाचे माजी आमदार नरेंद्र पवार आणि भाजपा पदाधिकारी संतोष शिंगोळे यांचे फोटो आहेत. तर तेजश्री गायकवाड यांनी निवडून येताच माजी आमदार नरेंद्र पवार यांची भेट घेतली होती. प्रभाग क्र. 4 मध्ये भाजपाला एकही जागा न दिल्याने भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी ठाकरे गटाच्या उमेदवारांचे काम केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यामुळे शिवसेना भाजपा महायुतीमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.





# वेलद्याची वाडी-पिंपळगाव जोडरस्त्याला अखेर मुहूर्त

## आमदार किसन कथोरेंच्या हस्ते वेलद्याची वाडी-पिंपळगाव रस्त्याचे भूमिपूजन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी /**
**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील सर्व आदिवासी वाड्या वस्तीमध्ये विकास होत असताना ठिक ठिकाणी रस्ते, पाणी, घरकुल योजना असा संपूर्ण विकासाचा कार्यक्रम आमदार किसन कथोरे यांच्या कार्यकुशलतेने होत आहेत.

मुरबाड तालुक्यातील वेलद्याची- वाडी पिपंळगाव येथे जोड रस्त्याचे भूमिपूजन आज मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य उल्हास भाऊ बांगर ,खरेदी विक्री संघाचे चेअरमन संतोष पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर यांच्या हस्ते भूमिपूजनाचे नारळ फोडण्यात आले. तसेच या प्रसंगी भाजपा तालुका अध्यक्ष दीपक पवार, जितेंद्र भावार्थे,युवा नेते अनिल घरत, अण्णा साळवे, तुकाराम चौधरी,सरपंच दिपक घरत,नरेश मोरे,सुदाम देसले,जयराम पगार, भाऊराव पवार,सुनिल बांगर,मनोज लाटे, पोलीस पाटील राम पंडीत, एकनाथ लाटे, अरूण शेख,उपस्थित होते. या कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्या बद्दल पवाळे सेवा सोसायटीचे मा. चेअरमन तुकाराम चौधरी यांनी आमदार किसन कथोरे यांचे आभार मानले आहेत.

# काळू व शाई धरणांविरोधात ग्रामस्थांचा निर्धार आणि जनजागृती

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**
**ठाणे** : जिल्ह्यातील शाई, काळू नदीवरील प्रस्तावित धरण प्रकल्पाविरोधात संघर्ष अधिक तीव्र होत आहे. काळू व शाई धरण विरोधी संघर्ष समितीच्या जनजागृती दौऱ्याला गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्यामुळे या संघर्षाची धार तेज होत असल्याचे वास्तव या गावामध्ये दिसून येत आहे. भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी एकजूट कायम ठेवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला. सरकारी दडपशाहीविरोधात संघर्ष आणखी धारदार करण्याचा इशारा देण्यात आला. जिल्ह्यातील काळू नदीवर प्रस्तावित असलेल्या काळू धरणामुळे बाधित होणाऱ्या गावांमध्ये शाई धरण विरोधी संघर्ष समिती व काळू धरण संघर्ष समितीने नुकताच दोन दिवसीय जनजागृती दौरा केला. जनसंघर्ष समिती, मुंबई कलापथकाच्या माध्यमातून गावोगावी संवाद साधत धरणामुळे होणारे विस्थापन, शेती-जंगलांचा नाश आणि स्थानिकांच्या न्याय्य हक्कांवर होणारा अन्याय प्रभावीपणे मांडण्यात येत आहे. भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी सर्वांनी राजकीय भूमिका बाजूला ठेवून एकीची वज्रमूठ कायम ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.या नदी काठावरील ग्रामस्थांवर येऊ घातलेले संकट परतवून लावण्यासाठी दोन्ही संघर्ष समित्यांनी हातात हात घालून लढा तीव्र करण्याचा निर्धार केला.

# पन्हाळा गिरिस्थान नगर परिषदेवर पर्यटकांची लुट व अस्वच्छतेचे आरोप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुंबई** : छत्रपती शिवाजी महाराज,झुंझार यौध्दा बाजीप्रभू देशपांडे,वीररत्न शिवा काशिद,यांच्या जाज्वल पराक्रमाने इतिहासात अजरामर झालेल्या ऐतिहासिक पन्हाळा किल्ल्यावरील पन्हाळा गिरि स्थान नगरपरिषदेकडून वसूल करण्यात येणा-या,प्रवाशी कर आणि वाहनतळ पावती व्दारे पर्यटकांची अक्ष:रश लुक सुरु असून त्यामानाने सोईसुविधांची पूर्ती वानवा दिसून येत आहे,शिवाय

स्वच्छता,उकडलेल्या लाद्या, तुटलेल्या खिडक्या, बोर्ड, मुतारीतून वाहणारे दुर्गंधी युक्त पाणी, कच-याचे ढिग , वसूली कर्मचा-यांचे उद्धट वर्तन, अरेरावी, दादागिरी यामुळे नगरपरिषदेचा मनमानी,भोंगळ कारभार समोर आला आहे,या विरोधात आपण कोल्हापूर जिल्हाधिका-याकडे तक्रार करणार असल्याचे पर्यटकांनी सांगितले,

इतिहासात पन्हाळा किल्ल्याला मोठे महत्व आहे,सिद्दी जोंहरच्या वेढ्यातून निसटण्या साठी वीररत्न शिवा काशिद यांनी केलेले आत्मबलिदान,झुंझार यौध्दा बाजीप्रभू देशपांडे,फुलाजी प्रभू देशपांडे,६००बांदल सैनिक यांचे रक्तरंजित भयानक युद्ध,राजाला वाचविण्यासाठी केलेले बलिदान



इत्यादी विविध कारणांमुळे हा गड कायमच पर्यटक,एतिहास संशोधक,अभ्यासक,यांच्यासाठी आकर्षणाचे केंद्र ठरलेला आहे,त्यामुळे आजही छत्रपती शिवाजी महाराज मंदिर,छ.ताराबाई राजवाडा,तीन दरवाजा,अंबरखाना,अंधारबाव,राजदिंडी,पुसाटी बुरुज,वाघ दरवाजा,सज्जा कोठी,रेडे महाल,नायकिनीचा सज्जा,इत्यादी ऐतिहास ठेवा पाहण्यासाठी पर्यटक ,विद्यार्थी,अभ्यासक,नागरीक संपूर्ण देशभरातून पन्हाळगडावर येत असतात.गडावर प्रवेश करतानाच नगरपरिषदेचा वसूली विभाग आहे,येथे प्रवाशी कर,व वाहनतळ पावत्या फाडल्यावर काही पर्यटक 'आपल्या नगरपरिषदेकडून काय सोईसुविधा आहेत या बाबत संबंधित कर्मचा-यांना विचारणा करतात,यावर सरळ उतरे न देता ,तूम्हांला काय करायचे आहे,गुपचूप पैसे द्या व निगा,कोणाकडे तक्रार करायची तिकडे करा?अशी उद्धट,अरेरावी,दादागिरी ची भाषा व वर्तन केले.यानंतर काही पर्यटक नगरपरिषदेच्या सार्वजनिक शौचालयाजवळ गेले तेंव्हा तिथे तुकलेल्या लाद्या उकडलेल्या जाळया,मुतारीतून दुर्गंधीयुक्त बाहेर वाहणारे सांडपाणी,ऐतिहासिक वास्तूंच्या आजुबाजूला,पडलेला प्लास्टिक,



कचरा,पिशव्या,रस्त्याच्या दुतर्फा घाण कचरा,कोठेही पार्क केलेल्या गाड्या,फिरती शौचालये,मुता-यांचा अभाव,इत्यादी गोष्टी प्रकर्षाने जाणवत होत्या,त्यामुळे पर्यटकांकडून मिळणा-या लाखो रुपये उत्पन्नाचे काय?ते कोणाच्या खिशात जातात हा प्रश्न उपस्थित करुन या विरोधात आपण जिल्हाधिकारी तसेच मंत्रालयात तक्रार करणार असल्याचे राहुल मोरे यांनी सांगितले(

# कल्याणात विणकाम व हस्तकलांची उलगडली समृद्ध परंपरा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी /**
**दि. १९ (कल्याण) :**
कल्याणकरांना वस्त्रे, विणकाम आणि हस्तकलांची समृद्ध भारतीय परंपरा पाहण्याची संधी बी. के. बिर्ला महाविद्यालयात नुकतीच मिळाली. महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे 'विणलेल्या परंपरा (वूवन लेगसीज): भारतातील उत्कृष्ट वस्त्रे, विणकाम आणि हस्तकला' या अनोख्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनात बांधणीचे कापड, यंत्रमागावरील कापड, सुती, रेशीम, ताग, पैठणी, इरकल, घोंगडी, गोणपाट तसेच विविध प्रकारच्या कापडांवरील छपाई, इम्ब्रॉयडरी आणि हस्तकलांचे सादरीकरण करण्यात आले होते. तृतीय वर्षाच्या इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी सिंधू संस्कृतीपासून ते आजपर्यंतच्या भारतीय वस्त्रोद्योगाचा प्रवास प्रभावीपणे मांडला.

प्रदर्शनाची संकल्पना 'भारतीय कलेचा इतिहास', 'जागतिक कलेचा इतिहास' आणि 'वारसा पर्यटनाची ओळख' या अभ्यासक्रमांवर आधारित होती. प्राचार्य डॉ. अविनाश पाटील आणि शिक्षण संचालक डॉ. नरेश चंद्र यांच्या उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनचे विभागप्रमुख डॉ. नितीन हडप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी 'वस्त्रांपासून फॅशनपर्यंत: भारतावरील ऐतिहासिक दृष्टिकोन' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

इतिहास विभागप्रमुख डॉ. सुवर्णा जाधव आणि सहाय्यक प्राध्यापिका डॉ. प्रणिता हरड यांनी प्रदर्शनाच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रदर्शनाला विविध महाविद्यालये, शाळा आणि नागरिकांनी भेट देत भारतीय वस्त्रपरंपरेच्या समृद्ध वारशाचा अनुभव घेतला.

# खर्डी महाविद्यालयात भूगोल विभागाची शैक्षणिक पर्यटन भेट यशस्वी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**खर्डी** : भूगोल विभागामार्फत दिनांक 15 जानेवारी ते 18 जानेवारी 2026 या कालावधीत कोकण, गणपतीपुळे, मार्लेश्वर, मालगुंड, डेरवण व पावस या पर्यटन स्थळांना शैक्षणिक भेट देण्याचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र घोडविंदे सर व महाविद्यालयायाचे प्राचार्य डॉ. कैलास कळकटे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर उपक्रम राबविण्यात आला. या भेटचे आयोजन भूगोल विभागामार्फत प्रा. विशाल भोसले व प्रा. रजनी परदेशी यांनी केले. भूगोल विभागातील 25 विद्यार्थी सदर सहलीत सहभागी झाले होते.

आपल्या दैनंदिन परिसरा व्यतिरिक्त महाराष्ट्राच्या इतर प्रदेशातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक विविधता अभ्यासण्याच्या उद्देशाने सदर उपक्रम राबविण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व यशस्वी रित्या उपक्रम पूर्ण केला.

# खंडणी विरोधी पथकाची धडक कारवाई

## गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे जप्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे** : खंडणी विरोधी पथकाचे ठाणे शहर अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ) डॉ. पंजाबराव उगले, पोलीस उपायुक्त (गुन्हे ) अमरसिंग जाधव, सहाय्यक पोलीस उपायुक्त विनय घोरपडे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी, सहायक पोलीस निरीक्षक सुनील तारमळे यांनी पोलीस हवालदार ठाकूर, शिंदे, जाधव, गायकवाड, शेजवळ, भोसले यांचे मतदीने गोपनीय बातमीदाराकडून प्राप्त माहितीच्या



आधारे दिनांक 18 जानेवारी 2026 रोजी 5.56 वाजताचे सुमारास साई पान शॉप समोर,फूट पथावर, इंटरसिटी मॉलचे बाजूला, वागळे इस्टेट ठाणे पश्चिम येथे विधीसंघर्षित बालक नावे अबक राहणार मुक्काम खजुरिहा कला, तहसील रामनगर राजापूर, जिल्हा चित्रकूट रहेपुरा पोलीस ठाणे, राज्य उत्तर प्रदेश हा दोन गावठी बनावटीचे पिस्टल व चार जिवंत काडतुसे असा एकूण दोन लाख 14 हजार किमतीचा माल अवैधरित्या विक्री करण्याचे इराद्याने बेकायदेशीर रित्या विनापरवाना कब्जात बाळगून ठेवले असताना मिळून असल्याने विधीसंघर्षित बालक नावे अबक यांचे विरुद्ध वागळे इस्टेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील तारमळे करीत आहेत.

# आदिवासी आश्रमशाळा क्रीडांगण भ्रष्टाचार : उपोषणाचा इशारा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी /**
**दि. १९ (मुरबाड):**
शासकीय आदिवासी आश्रमशाळांसाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या क्रीडांगण विकास अनुदान योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व आर्थिक अपहार झाल्याचा गंभीर आरोप अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष अण्णा मोतीराम साळवे यांनी केला आहे. या प्रकरणी निष्पक्ष चौकशी व कठोर कारवाईची मागणी करत त्यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांना स्मरणपत्र (रिमाइंडर) सादर केले असून, २६ जानेवारी २०२६ पासून ठाणे येथील जिल्हा क्रीडा कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही दिला आहे.

साळवे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अनेक आदिवासी आश्रमशाळांमध्ये प्रत्यक्ष क्रीडांगण विकासाचे काम न करता बनावट बिले, फोटो,खोटी मोजमापे व केवळ कागदोपत्री कामे दाखवून शासनाच्या निधीचा अपहार करण्यात आला आहे.





या अपहारात संबंधित मुख्याध्यापक, क्रीडा विभागातील अधिकारी-कर्मचारी, ठेकेदार व इतर संबंधित व्यक्तींचा सहभाग असल्याचा ठोस संशय आहे. हा निधी थेट आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शारीरिक विकासासाठी असताना तो डावलून करण्यात आलेला हा प्रकार अत्यंत निंदनीय असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या संदर्भात दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, शहापूर यांच्याकडे लेखी तक्रार सादर करूनही आजतागायत कोणतीही ठोस, पारदर्शक व परिणामकारक कारवाई झालेली नाही, याबाबत साळवे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नसल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर शिस्तभंग व फौजदारी कारवाई करावी, तसेच अपहार केलेली संपूर्ण रक्कम शासनाकडे वसूल करावी, अशी ठाम मागणी साळवे यांनी केली आहे. जर याबाबत योग्य दखल घेतली नाही तर २६ जानेवारी २०२६ पासून ठाणे येथील जिल्हा क्रीडा कार्यालयासमोर शांततामय, लोकशाही पद्धतीने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. उपोषणादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखली जाईल; मात्र उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या प्रकरणामुळे क्रीडांगण विकास अनुदान योजनेतील कथित भ्रष्टाचार पुन्हा एकदा चर्चेत आला असून, आता प्रशासन कोणती ठोस पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वतयारीसाठी विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी /**
**नवी मुंबई** : भारतीय प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्व तयारीची बैठक कोकण विभागाच्या सामान्य शाखेच्या अपर आयुक्त फरोग मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय समिती सभागृहात आज संपन्न झाली. कोकण विभागीय स्तरावरील भारतीय प्रजासत्ताक दिनाचा 77 वा वर्धापन दिन समारंभ दि. 26 जानेवारी, 2026 रोजी सकाळी 09.15 वाजता साजरा होणार आहे. मुख्य शासकीय ध्वजारोहण कळंबोली सेक्टर 17 येथील पोलीस मुख्यालय मैदानावर होणार आहे. त्यानुषंगाने बैठकीत मार्गदर्शन करताना श्रीमती मुकादम यांनी कोकण भवनातील सर्व विभागाने हा सोहळा यशस्वीरित्या व उत्साहात साजरा करण्याबाबत सूचना दिल्या. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी आणि हा कार्यक्रम उत्साहात साजरा करावा, असे सांगून सर्वांनी शासकीय पोशाखात कार्यक्रमास उपस्थित राहाव, असे त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांसह कोकण विभागातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

# खेवारे गावात समृद्धी पंचायत राज अभियानाचा उत्साहपूर्ण प्रारंभ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी /**
**दि. १९ (मुरबाड) :**
मुरबाड तालुक्यातील खेवारे गावात मुख्यमंत्री समृद्धी पंचायत राज अभियानाच्या प्रचारार्थ रविवार, १८ जानेवारी रोजी हास्यजत्रा फेम सेलिब्रिटी पृथ्वीक प्रताप आणि शिवाली परब यांनी भेट दिली. गावात सात प्रकारच्या गुढींचे आरोहरण करून गावच्या वेशीवर सेलिब्रिटी व पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद केंद्र शाळा खेवारे महाज येथे डिजिटल शाळेचे



वर्ग उद्घाटन फीत कापून केले गेले. गावात भव्य बैलगाडी शोभायात्रा काढण्यात आली, तसेच प्लास्टिक मुक्ती उपक्रमांतर्गत कापडी पिशव्या शिवणकेंद्राला भेट दिल्या. मुख्य गावात लेझीम पथक व फुलांच्या वर्षावात औक्षण करून डास निर्मूलन या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे उद्घाटनही करण्यात आले.

ग्रामपंचायत कार्यालय, वाचनालय आणि पंतप्रधान आवास योजना लाभार्थ्यांचे घरकुल वितरण करून प्रवेश केला गेला. तसेच जलसमृद्ध, स्वच्छ, हरित गाव खेवारे दर्शवणारे फलक व शेततलाव प्रदर्शन करण्यात आले. गावात तयार होणारे सेंद्रिय भाजीपाला, कुटीर उद्योगातील अन्नपदार्थ व जुन्या काळातील शेतीसाहित्याचे प्रदर्शनही करण्यात आले. पाहुण्यांनी येथे सेंद्रिय भाजीची खरेदी केली व दीप प्रज्वलन करून स्वागत केले.

सर्वांना समान महत्त्व या तत्वानुसार अभियानातील विविध घटकांमध्ये काम करणाऱ्या बारा व्यक्तींनी गावाचे परिचयात्मक प्रास्ताविक केले. पृथ्वीक प्रताप व शिवाली परब यांनी अभियानाचे मुख्य मुद्दे आणि संदेश ग्रामस्थांना रंगीत शैलीत मांडले, तसेच हास्याचे कारंजे फुलवले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांनी मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला उल्हासभाऊ बांगर, सुभाष आप्पा घरत, सुरेश बांगर, विश्वजीत नामजोशी, वसुंधरा संजीवनी मंडळ ठाणे, दीपक पवार, अनिल घरत यांसह अनेक पदाधिकारी, सरपंच श्रीमती नाडेकर, उपसरपंच अंकुश सुरोशे, ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन मधुकर पवार यांनी केले.

# भविष्यवेध



**मंगळवार**
**२० जानेवारी २०२६**

**मेष**
दिवस तुमच्यासाठी प्रलंबित कामे पूर्ण करण्याचा असेल. ज्यामुळे तुम्हाला मोठा आनंद मिळू शकतो. मात्र, स्वभाव काहीसा चिडचिडा होईल.

**वृषभ**
अनावश्यक राग टाळणे हिताचे ठरेल. कुटुंबातील सदस्यांशी वाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बोलताना संयम ठेवा. घराचे नूतनीकरण होईल.

**मिथुन**
वैयक्तिक गरजांवर खर्च होऊ शकतो. कुटुंबात एकजुटीचे वातावरण राहील. दिवस छंद जोपासण्यासाठी आणि आनंदासाठी खरेदी करण्याचा आहे.

**कर्क**
बोलण्यावर आणि वागण्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्राकडून एखादी चांगली बातमी मिळेल. हरवलेली प्रिय वस्तू आज सापडण्याची शक्यता आहे.

**सिंह**
प्रेमात असलेले व्यक्ती जोडीदारासोबत प्रवासाचा बेत आखू शकतात. कामाच्या ठिकाणी तुमच्या कार्याचा गौरव होईल निर्णयक्षमता आज उत्तम राहील.

**कन्या**
बुद्धिमत्तेच्या जोरावर विरोधकांवर मात कराल. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. कामातील अडथळे दूर होतील. जुना आजार डोके वर काढू शकतो.

**तुळ**
तब्येतीची काळजी घ्या. आर्थिक व्यवहारात स्पष्टता ठेवा. कारण उधार घेतलेले पैसे परत करावे लागू शकतात.. महत्त्वाच्या व्यक्तींशी गाठीभेटी होतील.

**वृश्चिक**
बाहेरील अन्नपदार्थ टाळावे. व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास चांगला नफा मिळेल. कुटुंबाकडून तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल.

**धनु**
इच्छा पूर्ण झाल्याने तुम्ही धार्मिक तीर्थयात्रेला जाऊ शकता. मुलांच्या संगतीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. प्रगतीच्या दिशेने वाटचाल कराल.

**मकर**
चुकांमधून धडा घेऊन पुढे जाणे फायद्याचे ठरेल. कुटुंब आणि मित्रांची साथ लाभेल. आर्थिक नियोजन करणे गरजेचे ,कौटुंबिक बाबींवर खर्च होऊ शकतो.

**कुंभ**
विद्यार्थ्यांना मानसिक तणावातून दिलासा मिळेल. व्यक्तींच्या निर्णयक्षमतेत सुधारणा होईल. मित्रांशी संबंध दृढ होतील. धार्मिक कार्यात रस वाढेल.

**मीन**
पूजेत वेळ घालवाल. रागावर नियंत्रण ठेवा. भावंडांना दिलेला सल्ला त्यांच्यासाठी फायदेशीर ठरेल. मोठी इच्छा पूर्ण होऊ शकते.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| Facebook | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| X | https://x.com/Jeevandeepvarta |
| www | https://jeevandeepvarta.com/ |






# जिल्हास्तरीय लेखनिक उद्बोधन वर्गात आधुनिक शालेय प्रणालीचे धडे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ऑनलाइन कामकाजाच्या कार्यपद्धतीची माहिती, शालेय प्रशासन, लेखनिकांचे कर्तव्य व इतर प्रशासकीय महत्त्वाच्या विषयांवर आधारीत जिल्हा परिषद शिक्षण विभाग ठाणे व महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 19 जानेवारी 26 रोजी सेठ एन. के. टी. कनिष्ठ महाविद्यालयाचे सभागृह, खारकर आळी, ठाणे येथे लेखनिक उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये लेखनिकाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या,शालेय हिशोब व लेखापरीक्षण, पेन्शन केस संदर्भात मार्गदर्शन, शालार्थ प्रणाली या विषयावर सहाय्यक लेखा अधिकारी सुनील जोशी, सतीश नाडगौडा, मिलिंद जोशी, उप शिक्षणाधिकारी श्रीमती प्रांजल राऊत व सचिन पिंगळे यांनी मार्गदर्शन केले.





उद्बोधन वर्गासाठी महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षकेतर संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्षा स्मिता खरात, कार्यवाहक किशोर पाटील, कार्याध्यक्ष हर्षल मिस्त्री, विस्तार अधिकारी प्राजक्ता राऊत सह ठाणे जिल्ह्यातील सर्व अनुदानित माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील लिपिक बंधू-भगिनींनी उपस्थित राहून लाभ घेतला.

### लेखनिक उद्बोधन वर्गावर बहिष्कार

महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघटना व जिल्हा परिषद शिक्षण विभाग ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.19 जानेवारी 2026 रोजी लेखनिक उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले असून सदरचे उद्बोधन वर्गासाठी माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना ठाणे जिल्हा या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता किंवा कोणतीही चर्चा न करता परस्पर या उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या संघटनेचा या उद्बोधन वर्गाशी कोणताही संबंध नाही. सदर तथाकथित संघटनेचा आपल्या जिल्ह्याची काडीमात्र संबंध नाही. ठाणे जिल्ह्यात आपली एकमेव कार्यरत संघटना आहे. याबाबतीत शिक्षणअधिकारी माध्यमिक यांच्याशी चर्चा करण्यात येईल.

**- भरत जाधव, अध्यक्ष,माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना ठाणे जिल्हा**


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

**ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६**

जाहीर सूचना

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निवडणुकीच्या कालबध्द कार्यक्रमानुसार, दि. १५ जानेवारी, २०२६ रोजी ठाणे महानगरपालिकेच्या १ ते ३३ निवडणूक प्रभागांकरीता मतदानाची प्रक्रिया पार पडलेले असून, दि. १६ जानेवारी, २०२६ रोजी सर्व निवडणूक प्रभागांकरीता मतमोजणीअंती मतमोजणीचा निकाल जाहीर केलेला आहे. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेच्या सर्व १ ते ३३ निवडणूक प्रभागांकरीता निवडून आलेल्या उमेदवारांची नावे, त्यांचा पक्ष व त्यांनी मिळवलेली वैध मते याची अधिसूचना दि.१९ जानेवारी, २०२६ रोजी शासन राजपत्र प्रसिध्द करण्यात येत आहे.

ठामपा/पिआरओ/निवडणूक/१०८५/२०२५-२६ सही/-

दि:१९.०१.२०२६ सौरभ राव, भा.प्र.से

**Pls visit our official web-site** महापालिका आयुक्त,

**www.thanecity.gov.in** ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**

**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**


## माझे कल्याण शहर प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेले सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक वारसा लाभलेले शहर म्हणजे कल्याण शहर. कल्याण शहराला विशिष्ट असे व्यक्तिमत्व आहे याच कल्याण शहराविषयी आपल्याला बहुविध माहिती असणं ही एक फार मोठी प्रेरणा ठरते, याच अनुषंगाने मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त सार्वजनिक वाचनालय कल्याणच्यावतीने "माझे कल्याण शहर प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२६" चे आयोजन करण्यात आले होते. कल्याण शहरातील तब्बल ४३ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

कल्याण सांस्कृतिक इतिहास,सुभे कल्याण, १०० वर्षांचा नगरपालिका अहवाल अशा विविध संदर्भग्रंथातील प्रश्न छत्रपतीशिवाजी महाराज कल्याणमध्ये कधी आले? कल्याणमध्ये इलेक्ट्रिक सप्लाय केव्हा आली?,प्रभाकर ओक टॉवर बांधणीचा खर्च किती आला? भारताचार्य चिंतामण वैद्य यांना भारताचार्य पदवी कोणी दिली?, स्वातंत्र्यवीर सावरकरांचे काव्यमय चरित्र लिहिण्याचा मान कोणाला मिळाला?, कल्याणचे पहिले दैनिक कोणते? पोखरण तलाव कोठे आहे? असे विविध प्रश्न स्पर्धकांना विचारण्यात आले होते.वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांच्या संकल्पनेतून ही माहितीपर स्पर्धा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली "कल्याण" या संदर्भग्रंथाचे लेखक श्रीकांत पेटकर, विवेकानंद विचारमंचचे ज्येष्ठ साहित्यिक प्रविण देशमुख, वाचक दिप्ती जोशी, धनंजय गोरे यांनी या स्तुत्य उपक्रमासाठी आभार मानुन शुभेच्छा दिल्या. प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी, उपाध्यक्षा आशा जोशी, कार्यकारिणी सदस्य अरविंद शिंपी, वाचक वर्ग, श्रोता वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

## गोवेली : मराठी बोलीवैभव जपण्यासाठी 'बोलींचा जागर'

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. १९ (गोवेली) :** गोवेली येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत 'बोलींचा जागर' हा विशेष कार्यक्रम दि. २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत आयोजित केला जाणार आहे. या उपक्रमाद्वारे मराठी भाषेतील विविध बोलींचे जतन, संवर्धन आणि अभ्यास यांना चालना देण्याचा उद्देश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडी व शोभायात्रेने होईल. मुख्य कार्यक्रमात स्थानिक वारली, कुपारी बोलीतील पारंपरिक लोककला, संवाद व बोलीभाषा अभ्यासकांचे मार्गदर्शन यांचा समावेश असेल. डॉ. नेहा सावंत आणि डॉ. रुपेश कोडिलकर हे प्रमुख मार्गदर्शक,




श्री. रवींद्र घोडविंदे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. प्राचार्य डॉ. अशोक वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. हरेंद्र सोष्टे आणि प्रा. सतीश लकडे हे कार्यक्रमाचे संयोजक आहेत.

आयोजकांनी विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, भाषा अभ्यासकांनी, साहित्यप्रेमींनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## कल्याणच्या राजाचे जल्लोषात आगमन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील तिसाई प्रतिष्ठानतर्फे दरवर्षीप्रमाणे माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने "कल्याणचा राजा" श्री गणरायाची भव्य दिव्य आगमन मिरवणूक भक्तिभावात व जल्लोषात रविवारी संपन्न झाली. ढोल-ताशांच्या निनादात, हरिनामाच्या पवित्र गजरात विघ्नहर्त्याचे मंगलमय आगमन झाले. भक्तांच्या अपार श्रद्धा, आनंद आणि उत्साहाने संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारून गेला. या सोहळ्याला आमदार सुलभा गायकवाड, माजी नगरसेवक अभिमन्यू गायकवाड, नगरसेविका मनिषा गायकवाड, तिसाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष वैभव गायकवाड यांच्यासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच असंख्य भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कल्याणची अस्मिता आणि श्रद्धेचे स्थान असलेल्या "श्री तिसाई प्रतिष्ठाण" आयोजित "कल्याणचा राजा" - माघी गणेशोत्सवांचे यंदाचे वर्ष हे उत्सवाचे आणि अभूतपूर्व चैतन्याचे आहे. या वर्षापासून बाप्पाच्या "पारंपारिक आगमन सोहळ्याचे" आयोजन करण्यात आले आहे. रविवारी कल्याण पूर्वेतील चक्कीनाका, पुनालिंक रोड ते आई तिसाई देवी मंदिर, तिसगाव अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. यंदाच्या माघी गणेशोत्सवाचे विशेष आकर्षण पर्यावरणपूरक मूर्ती असून ठाणे जिल्ह्यातील सर्वात प्रथम अशी माघी गणेशोत्सवातील "टिशू पेपर" पासून (कागदी) बनवलेली भव्य श्री गणेश मूर्ती आहे. तसेच ६१ फूट उंच केदारनाथ मंदिराची नेत्रदीपक प्रतिकृती देखील याठिकाणी साकारण्यात आली आहे.

## ठाणे: कातळशिल्पांचे संवर्धन आणि प्रदर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** कोकणातील २० हजार वर्षे जुनी कातळशिल्पे म्हणजे आद्य मानवाच्या जीवनाचा कलात्मक आविष्कार आहे. या कातळशिल्पांचे संशोधन आणि संवर्धन होणे ही काळाची गरज आहे. कातळशिल्पांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने प्राच्यविद्या अभ्यास संस्था, जोशी-बेडेकर महाविद्यालय आणि डॉ. बेडेकर रुग्णालय यांच्या वतीने एका आगळयावेगळया प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.प्राच्यविद्या अभ्यास संस्था १९८२ पासून संस्कृती, इतिहास आणि पुरातत्त्व या विषयात सातत्याने प्रबोधनात्मक काम करीत आहे. नवीन वर्षाची सुरुवात संस्था एका अभिनव उपक्रमाने करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे हे प्रदर्शन. २१ ते २६ जानेवारी दरम्यान सकाळी ११ ते ५ पर्यंत खुले असेल.ठाण्यातील ज्येष्ठ कलाकार सदाशिव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या कातळशिल्पांच्या प्रतिकृती, हे खास आकर्षण असेल.

## राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाची दिनदर्शिका २०२६ प्रकाशित"

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. १९ (पेण) :** राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या ओबीसी एकजूट दिनदर्शिका २०२६ चे भव्य प्रकाशन पुणे येथे ओबीसी योद्धा ॲड. मंगेश ससाने यांच्या शुभहस्ते पार पडले. राज्यभरातून ओबीसी समाजाचे प्रतिनिधी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दिनदर्शिकेचा उद्देश ओबीसी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, शैक्षणिक प्रगती, सामाजिक जागृती व संघटन बळकटीकरण यासाठी मार्गदर्शन करणे आहे. प्रकाशनासाठी महाज्योती प्रकल्प संचालक सुवर्णा पगार यांचे विशेष योगदान लाभले. ॲड. मंगेश ससाने यांनी कार्यक्रमात ओबीसी समाजाच्या एकजुटीचे महत्त्व आणि शिक्षक संघटनांची भूमिका अधोरेखित केली.

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी या दिनदर्शिकेला ओबीसी चळवळीचे मार्गदर्शक दस्तऐवज ठरण्याचा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमात राज्य सरचिटणीस संतोष भोजने, राज्य कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण, राज्य महिला अध्यक्ष रेखाताई सुडे, राज्य मनपा प्रमुख श्रीराम पळसकर, राज्य प्राध्यापक प्रमुख सुवर्णाताई पगार, राज्य मार्गदर्शक अभय पाटील, राज्य उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, राज्य नेते लहू राक्षे यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप ओबीसी एकजुटीचा निर्धार करत घोषणांनी करण्यात आला.

## टीईटीमध्ये केडीएमसीच्या शिक्षकांचे उल्लेखनीय यश

### ६० टक्के शिक्षक पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. १९ (कल्याण) :** कल्याणमध्ये केडीएमसी शाळांमधील शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) त पहिल्याच प्रयत्नात ६० टक्के यश मिळविले आहे. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी घेतलेल्या परीक्षेत ३५ शिक्षकांपैकी २१ शिक्षक उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ५ शिक्षकांनी दोन्ही पेपर (इयत्ता १–५ व ६–८) उत्तीर्ण केले आहेत.

सामान्यतः या परीक्षेत फक्त ३–४ टक्के यश मिळते, त्यामुळे केडीएमसी शिक्षकांचे हे यश महत्त्वपूर्ण मानले जात आहे. प्रशासन अधिकारी भारत बोरनारे आणि शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी या यशाबद्दल प्रोत्साहन दिले.

## विभागीय खो-खो स्पर्धेत रा.फ. नाईक महिला संघ व शिर्सेकर्स अकॅडेमी विजेती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** श्री मावळी मंडळ, ठाणे यांच्या वतीने आयोजित द्वितीय विभागीय खो-खो स्पर्धा १७ व १८ जानेवारी रोजी संस्थेच्या क्रीडांगणावर उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत महिला गटात रा. फ. नाईक महिला खो-खो संघ (ठाणे) व पुरुष गटात शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडेमी (मुंबई उपनगर) या संघानी विजेतेपद पटकावले. तसेच, महिला गटात ज्ञानविकास फॉउंडेशन स्पोर्ट्स क्लब (ठाणे) व पुरुष गटात विहंग क्रीडा मंडळ (ठाणे) या संघानी उप-विजेतेपद पटकावले.




महिला गटातील अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात ठाण्याच्या रा. फ. नाईक महिला खो-खो संघाने ठाण्याच्या ज्ञानविकास स्पोर्ट्स फॉउंडेशन संघावर १०-०९ असा १ गुण व ०:०३ सेकंद राखून विजय मिळविला. रा. फ. नाईक महिला खो-खो संघाने नाणेफेक जिंकून संरक्षणाची निवड केली. पुरुष गटातील अंतिम सामन्यात मुंबई उपनगरच्या शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडेमी संघाने ठाण्याच्या विहंग क्रीडा केंद्र संघावर १६-११ असा ०५ गुणांनी विजय मिळविला. विहंग क्रीडा केंद्र संघाने नाणेफेक जिंकून संरक्षणाची निवड केली.

स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरणाचा समारंभ प्रमुख पाहुणे नगरसेवक सुधीर कोकाटे व विशेष अतिथी जेष्ठ पत्रकार सुहास जोशी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे, उपाध्यक्ष मनीष मुंदडा, चिटणीस रमण गोरे, सहाय्यक चिटणीस चिंतामणी पाटील, विश्वस्त कृष्णा डोंगरे, विशवस्त केशव मुकणे हे उपस्थित होते.

उदयोन्मुख खेळाडू गुड्डी राठोड (शिवभक्त स्पोर्ट्स क्लब ठाणे) उत्कृष्ट संरक्षक गीतांजली नरसाळे (रा. फ. नाईक महिला खो-खो संघ ठाणे), उत्कृष्ट आक्रमक धनश्री कंक, श्वेता जाधव (ज्ञानविकास स्पोर्ट्स फॉउंडेशन ठाणे),अष्टपैलू खेळाडू : वैष्णवी जाधव (रा. फ. नाईक महिला खो-खो संघ ठाणे) यांनाही सन्मानित करण्यात आले.

## निवडणूक कामात व्यस्त भिवंडी मनपा

### नागरिकांच्या समस्या वाढल्या



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. १९ (भिवंडी) :** भिवंडी महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी निवडणूक कामात गुंतल्यामुळे शहरातील स्वच्छता व रस्त्यांच्या देखभालीवर दुर्लक्ष झाल्याचे नागरिकांनी नोंदवले आहे. नियोजित वेळेत कचरा उचलला न गेल्याने अनेक ठिकाणी ढीग तयार झाले असून दुर्गंधी आणि मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. निवडणुकीमुळे रोड कामगार गायब झाले असून, पाच प्रभागांतील ठेकेदारांकडून स्वच्छता कार्यात विलंब होत आहे. रस्त्यांचे खड्डे आणि अर्धवट आरसीसी कामांमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पीपल्स रिपब्लिकन पक्ष व भिमशक्ती संघटनेने महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्याकडे या समस्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

## ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉमध्ये DLLE फेस्टिव्ह आणि फन फेअरचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. १९ (पेण) :** ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ, सानपाडा येथे १७ जानेवारी २०२६ रोजी DLLE (Department of Lifelong Learning & Extension) यांच्या मार्गदर्शनाखाली "DLLE फूड फेस्ट अँड फन 'एन' फेअर" उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. विद्यार्थ्यांच्या उद्योजकता व सर्जनशीलतेला वाव देणारे पावभाजी, पाणीपुरी, शेवपुरी, मसाला वेफर्स चाट, कांदेपोहे, केक पॉप्स, कोल्ड्रिंक तसेच मेहंदी काढणे, प्ले अँड अर्न यांसारखे विविध स्टॉल्स आणि उपक्रम आयोजित करण्यात आले.




या फेस्टिव्हलमध्ये प्रथम क्रमांक पावभाजी स्टॉल (अनिशा साई कुलये, आदित्य गुप्ता, चिंतन पटेल), द्वितीय क्रमांक जोईंज स्पेशल टँगी टाउन (ज्योत्सना समंता, राशी रायकवार) आणि तृतीय क्रमांक पाणीपुरी स्टॉल व केक पॉप्स (मिस्बा पटेल, पेचिअम्मल) यांना मिळाला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. हर्षा गोयल होत्या. प्राचार्य डॉ. गोरधन एन. देवनानी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. DLLE समन्वयक ऋतुजा चव्हाण व सहाय्यक प्राध्यापक मोहम्मद अशरफ यांनी आयोजनात मोलाचे योगदान दिले. सर्व विद्यार्थ्यांचे कौशल्यविकास, उद्योजकता आणि सहभाग विशेष कौतुकास पात्र ठरले.



ठाणे ■ मंगळवार
२० जानेवारी २०२६
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# बाळ्या मामांच्या वाढदिवसानिमित्त आशासेविकांचा सत्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खा. सुरेश गोपीनाथ म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पंचायत समिती आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या शहापूर तालुक्यातील आशासेविकांचा समारंभपूर्वक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे जिल्हा समन्वयक संतोष शिंदे यांच्यातर्फे सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. म्हात्रे यांच्या पत्नी शारदाताई म्हात्रे यांच्या हस्ते प्रत्येक आशासेविकांना मायेची साडी सन्मान म्हणून भेट देण्यात आली. सुमारे साडेचारशे आशासेविकांचा सन्मान करण्यात आला.
यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे जिल्हा समन्वयक संतोष शिंदे, ठाणे महिला जिल्हा अध्यक्षा विद्याताई वेखंडे, तालुका अध्यक्ष नंदकुमार मोगरे, सामाजिक न्याय विभागाचे अविनाश थोरात, शहापूर नगरपंचायत माजी नगराध्यक्ष रजनी शिंदे, कमलताई भोईर, विनायक पवार, विनायक साबळे, पंचायत समितीचे कर्मचारी, अधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोंबिवलीत निसर्गमेळा

## ५२० विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** पर्यावरण दक्षता मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ डोंबिवली, फिनिक्स यांच्या वतीने निसर्गमेळा २०२६ चे आयोजन केले होते. यामध्ये विविध सातवी, आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत एकूण २३ शाळांतील ५२० विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धामागचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण शिक्षण देणे व त्याचबरोबर जनजागृती घडविणे हा होता. या निसर्गमेळयात झाडे ओळखा स्पर्धा, पीपीटी

**पर्यावरण दक्षता मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ डोंबिवली, फिनिक्स यांच्या वतीने निसर्गमेळा**

सादरीकरण, स्वाक्षरी संकलन स्पर्धा, फुलपाखरू ओळखा, वक्तृत्व स्पर्धा यावर आधारित मानव वन्यजीव संघर्ष आणि बदलती खाद्य संस्कृती, चित्रकला स्पर्धा, मातीचे भांडे रंगवणे स्पर्धा, रील इट लाईव्ह आणि पथनाट्य अशा दहा स्पर्धांचा समावेश होता.

# मनसेचे गणेश लांडगे ठरले 'जायंट किलर'

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणूक नुकतिच पार पडली असून, या निवडणुकीत अनेक दिग्गजांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. यामध्ये भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक तथा केडीएमसीचे माजी स्थायी समिती सभापती संदीप गायकर यांचा देखील सहभाग आहे. मनसेचे शाखा अध्यक्ष गणेश लांडगे यांनी त्यांचा पराभव करून जायंट किलर ठरले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळा रंगली आहे.

कल्याण मधील प्रभाग क्र. 7 ड मधून भाजपाच्या वतीने डॉ. पंकज उपाध्याय यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी पक्ष आदेशानुसार उपाध्याय यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. यानंतर भारतीय जनता पार्टीने अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या माजी स्थायी समिती सभापती संदीप गायकर यांना



मनसेचे विभाग अध्यक्ष कपिल पवार आणि मनसेचे शाखा अध्यक्ष गणेश लांडगे हे गेली 10 वर्षे प्रभागास कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयात सक्रीयपणे काम करत असल्याचे पाहायला मिळाले

### संदीप गायकरांचा पराभव

भाजपा पुरस्कृत उमेदवार म्हणून जाहीर केले. मात्र कोविड काळानंतर प्रभागात न फिरकल्याने मतदारांनी त्यांना नाकारत मनसेच्या गणेश लांडगे यांना पसंती दिल्याची चर्चा आहे.

तर मनसेचे विभाग अध्यक्ष कपिल पवार आणि मनसेचे शाखा अध्यक्ष गणेश लांडगे हे गेली 10 वर्षे प्रभागासः कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयात सक्रीयपणे काम करत असल्याचे पाहायला मिळाले. प्रभागातील नागरिकांच्या समस्या असो कि शहरातील नागरिकांच्या संदर्भात एखादा विषय, या दोघांच्या जोडीने अनेक विषय लावून धरत नागरिकांना न्याय मिळवून दिला आहे. त्याप्रमाणे मनसे पक्षातर्फे प्रभाग क्र. 7 ड मध्ये गणेश लांडगे यांना आणि कपिल पवार यांच्या पत्नी सोनल पवार यांना प्रभाग क्र. 9 ब मधून उमेदवारी देण्यात आली. मात्र सोनल पवार यांचा यात पराभव झाला असून गणेश लांडगे यांनी भाजपाच्या संदीप गायकर यांचा पराभव करत जायंट किलर ठरले आहेत. या निकालानंतर आता कपिल पवार यांच्याकडे शहराची जवाबदारी देण्याची मागणी मनसे कार्यकर्त्यांमधून होत आहे.

# दुबई खान्देश महोत्सव उत्साहात ; समाजातील एकोपा अधिक दृढ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** "खान्देशी in UAE" या सामाजिक व सांस्कृतिक समूहाच्या वतीने खान्देश महोत्सव २०२६ नुकताच अजमान, दुबई येथे मोठ्या उत्साहात पार पडला. सुमारे २०० पेक्षा अधिक खान्देशी बांधव-भगिनींनी सहभाग घेतल्याने कार्यक्रमात उत्साही वातावरण निर्माण झाले. मुलांसाठी आयोजित 'तीन पावली' खान्देशी नृत्य कार्यशाळा, तसेच प्रौढ व मुलांसाठी विविध गट-खेळ ही प्रमुख आकर्षणे ठरली.

कार्यक्रमाच्या शेवटी सभासदांनी कुटुंबासह ओळख करून देत संवाद साधला, त्यामुळे परदेशात राहूनही समाजातील एकोप्याची भावना अधिक दृढ झाली. यावेळी दुबईतील उद्योगपती धीरज जैन यांची आई-वडिलांसह विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या सामाजिक व व्यावसायिक कार्याची दखल घेत त्यांचा "खान्देश आयकॉन" म्हणून सत्कार करण्यात आला. महोत्सवात शेव-भाजी, भाकरी, वांग्याचे भरीत, कढी-खिचडी अशा अस्सल खान्देशी पदार्थांची मेजवानी देण्यात आली. समारोपप्रसंगी अहिराणी गाण्यांच्या तालावर सर्वांनी एकत्र ठेका धरत आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी भूषण चौधरी, घनश्याम पाटील, महेश जायखेडकर, राहुल पाटील, गणेश बोरसे, चंद्रशेखर जाधव व पिनल चौधरी यांनी पुढाकार घेतला. तर कमलेश जगताप, सारिका जायखेडकर, स्मिता पाटील, अजय पाटील, अनिल वायकर, संजय पाटील, धीरज पाटील, प्रियांका सोनकुल, स्वाती भोळे, दिपाली, रोही पवार, सचिन अमृतकर, प्रसाद पाटील, मानवेंद्र चौधरी, वर्षा बोरसे, प्रिया पाटील, मनीषा चौधरी, सुप्रिया पाटील, संदीप चौधरी, जितेंद्र, सागर गोहिल, गणेश पाटील व निलेश ब्राह्मणकर यांनी परिश्रम घेतले. एकूणच, खान्देश महोत्सव २०२६ हा परदेशातही खान्देशी संस्कृती, परंपरा व एकात्मता जपणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.



# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ची अंतिम उत्तरसूची जाहीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** शासन निर्णय दि.23 ऑगस्ट, 2013 अन्वये शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) परीक्षेचे आयोजन रविवार दि.23 नोव्हेंबर 2025 रोजी करण्यात आले होते.महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) 2025 पेपर क्र.1 व पेपर क्र.2 ची अंतिम उत्तरसूची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या http://mahatet.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.12 जानेवारी 2026 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.तरी पेपर क्र.1 व पेपर क्र.2 साठी प्रविष्ठ झालेल्या उमेदवार परीक्षार्थ्यांचा अंतरिम निकाल दि.16 जानेवारी 2026 रोजी http://mahatet.in या संकेतस्थळावर उमेदवार/परीक्षार्थ्यांच्या लॉगिनमध्ये ऑनलाईन पद्धतीने सायंकाळी 6.00 वाजल्यापासून पाहता येईल. अंतरिम निकालाच्या अनुषंगाने गुणपडताळणी करावयाची असल्यास अथवा त्रुटी/आक्षेप असल्यास http://mahatet.in या संकेतस्थळावर दि.16 जानेवारी 2026 ते दि.21 जानेवारी 2026 रोजी सांयकाळी 6.00 वाजे पर्यंत उमेदवार/परीक्षार्थींना लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीने आक्षेप नोंदविता येईल. अन्य मार्गाने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची संबंधित सर्व उमेदवार/परीक्षाथीनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे.

# पिंपळास येथील जि. प. शाळेत 'आनंद बाजार' उपक्रम





विद्यार्थ्यांनी विक्रेता व ग्राहक अशा दोन्ही भूमिका निभावत बाजाराचा मनमुराद आनंद घेतला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पिंपळास येथे आनंद बाजार' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शाळेतील विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, आर्थिक साक्षरता, संवाद कौशल्य, नियोजन, सहकार्य व आत्मविश्वास यांचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा उद्देश ठेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी यासाठी 'आनंद बाजार' हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला होता. याआनंद बाजारामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून एकूण 25 छोटे दुकाने (स्टॉल्स) मांडण्यात आले होते. यामध्ये मिनी समोसे, समोसे, वडापाव, काकडी, चटपटीत पदार्थ तसेच विविध प्रदर्शनात्मक साहित्य विक्रीस ठेवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विक्रेता व ग्राहक अशा दोन्ही भूमिका निभावत बाजाराचा मनमुराद आनंद घेतला.

यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सीमा चौधरी, उपाध्यक्ष महेंद्र भोईर, सदस्य विजय चौधरी, रविंद्र देसले, ग्रामपंचायत सदस्या भावना भोईर, माजी विद्यार्थी संघाचे सदस्य, ग्रामस्थ तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करत त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तर पुस्तकातील ज्ञान प्रत्यक्ष जीवनाशी जोडत मुलांना व्यवहारातून शिकता यावे, यासाठी 'आनंद बाजार' हा उपक्रम प्रभावी माध्यम ठरला असल्याचे दिसून आले.

# कुंरूद येथील बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूलच्या वार्षिक कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या कुंरूद येथील बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूल व ज्युनियर कॉलेजच्या वार्षिक महोत्सवाला पालक, विद्यार्थ्यांचां उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अनामिका एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक महोत्सव कार्यक्रम शाळेच्या प्रांगणात शनिवारी घेण्यात आला. यावेळी





उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती मातेच्या मुर्तीला पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मख्याध्यापिका मोनीका मराडे यांनी शाळेने १७ वर्षात पदार्पण केले असुन २४-२५ शैक्षणीक सालातील शाळेच्या यशस्वी वाटचालीचा लेखाजोखा मांडून शाळेला मुख्यमंत्री "माझी शाळा सुंदर शाळा" अभियानाअंतर्गत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाल्याचे प्रस्ताविक करताना सांगितले यावेळी १ली ते ९ वीच्या व ११ वीतील विद्यार्थ्यांनी मोबाईलचे दुष्परिणाम, शेतकरी, पाणी वाचवा, ऑपरेशन सिंदुर, देशभक्तीपर गृप डान्स, सोलो डान्स, सामाजिक संदेश देत नाटक सादर करून उपस्थितांची मने जिंकली यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष बी. बी. पाटील यांनी शाळा ऊभी करताना विविध स्तरांवर करावा लागलेला संघर्षाची कहाणी "माझी जिवनबाग" या कवीतेतुन सादर केली. तर यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अँक्टीव्ह स्टुडंट, पालक, बेस्ट टीचर पूरस्कार देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त शिक्षक बबन जाधव, भाजप ग्रामीण पुर्व मंडळ तालुका अध्यक्ष श्रीकांत गायकर पंचायत समिती माजी उपसभापती गुरूनाथ जाधव, अँड. प्रदीप मते माजी सरपंच मनोहर भोईर, सेवानिवृत्त शिक्षक डुकले सर, पत्रकार मेघनाथ विशे, संजय पटेल, मुख्याध्यापिका मोनीका मराडे, अनामिका पाटील शिक्षक, शिक्षीका, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सेलिब्रिटींच्या गावभेटी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** राज्य शासनाच्या "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान"च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व गावपातळीवर जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने सेलिब्रिटी भेटींचे आयोजन करण्यात आले. या अभियानाच्या प्रचारासाठी अभिनेत्री शिवाली परब व अभिनेते पृथ्वीक प्रताप यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील गावांना भेटी दिल्या.

त्याअनुषंगाने दि. १८ जानेवारी २०२६ रोजी भिवंडी तालुक्यातील डोहळे, शहापूर तालुक्यातील भावसे-खोस्ते तसेच



मुरबाड तालुक्यातील खेवारे येथे कार्यक्रम उत्साहात पार पडले. यावेळी शिवाली परब यांनी अभियानात प्रत्येक ग्रामस्थाने सक्रिय सहभाग घ्यावा व स्पर्धात्मक स्वरूपात सहभागी होऊन गावाने बक्षिसे मिळवावीत, असे आवाहन केले. पृथ्वीक प्रताप यांनी शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता व पाणीपुरवठा आदी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणा सज्ज असून ग्रामस्थांनी अभियानातील उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमास आमदार दौलत दरोडा, माजी सदस्य सुभाष (आप्पा) घरत, उल्हासभाऊ बांगर, माजी सभापती अनिल घरत, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे उपस्थित होते.

# 'अपूर्णांकाच्या जगात' प्रकल्पासाठी सुनील परटोले प्रथम क्रमांकावर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद :** जिल्हा परिषद शाळा कळमपाडा येथील शिक्षक सुनील परटोले यांनी सादर केलेल्या 'अपूर्णांकाच्या जगात' या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. त्यांची राज्यस्तरासाठी निवड झाली.

ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे शहाड येथील सेंच्युरी रेयॉन हायस्कूल येथे विज्ञान प्रदर्शन स्पर्धा पार पडले. या स्पर्धेत प्राथमिक विभागाचे २७, माध्यमिक विभागाचे २८ प्रकल्प, प्राथमिक शिक्षकांचे १० व माध्यमिक शिक्षकांचे ११ शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा परिचर ५ व दिव्यांग ४ असे ८५ प्रकल्प जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात मांडण्यात आले होते.

# "बडे भाग मानुष तन पाव" : डॉ. विजय पंडित यांचा कथासंग्रह प्रकाशित



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील के.एम. अग्रवाल महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद दि. १६-१७ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला. देशभरातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, संशोधक व विद्यार्थ्यांनी या परिसंवादात सक्रिय सहभाग घेतला.

परिसंवादाचे उद्घाटन महाविद्यालयाचे अध्यक्ष व साहित्यिक डॉ. विजय पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. उद्घाटन सत्राचे अध्यक्षपद महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या माजी अध्यक्षा प्रा. शितला दुबे यांनी भूषवले, तर मुख्य भाषण प्रा. मनोज सिंह यांनी केले. प्रमुख पाहुण्या म्हणून आयसीसीआर, मुंबई झोनल डायरेक्टर रेणू पृथियानी उपस्थित होत्या.

स्वागताध्यक्ष ओम प्रकाश पांडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्राचार्य डॉ. अनिता मन्ना यांनी परिसंवादाची उद्दिष्टे व शैक्षणिक महत्त्व स्पष्ट केले. व्यवस्थापन समितीचे कांतिलाल जैन, डॉ. सुजित सिंग व विजय तिवारी यांची उपस्थिती लाभली.

उद्घाटन सत्रात चार महत्त्वाच्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. यामध्ये अमरकांत, मध्य आशियातील हिंदी, पंडित विद्यानिवास मिश्र यांच्यावरील ग्रंथ तसेच डॉ. विजय पंडित यांचा लघुकथा संग्रह "बडे भाग मानुष तन पाव" यांचा समावेश होता. उपस्थितांनी या संग्रहाचे विशेष कौतुक केले.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024